# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFICTION/ 65 /2018
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग,यांचे कार्यालय,
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :– 10092018
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

संदर्भ :–१) शहर अभियंता, भिवंडी निजामपूर शहर म.न.पा. यांचे क्र. भिनिशमनपा/बांधकाम/३०४२/२०१८ दि. ०५/०९/२०१८
२) पोनि, भिवंडी वाहतूक उपविभाग कडील जा.क्र. ३९०/२०१८ दि.०६/०९/२०१८

## ''वाहतूक नियंत्रण अधिसुचना''

भिवंडी शहरातील जुना मुंबई आग्रा रोडवर नवीन एस.टी.स्टॅण्ड ते कल्याण नाका असा स्व. राजीव गांधी उड्डाणपुल असून या पुलाचे डेस्क स्लॅपला काही ठिकाणी तडे गेल्याने या कामाचे दुरूस्ती करीता या पुलावरून जड–अवजड वाहनांची ( सहा टायर व त्यावरील चाके असलेली मालवाहू वाहने ) होणारी वाहतूक ही सुरक्षिततेच्या दृष्टीने बंद करणे आवश्यक असल्याने सदर मार्गावरील व परिसरातील वाहतूक सुनिश्चित होण्याकरीता, आम जनतेच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. –११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, मी अमित का.काळे, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर खालील प्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :–

१) वाडा तसेच नाशिक बाजुकडून वंजारपट्टी येथून भिवंडी शहरात येणाऱ्या जड अवजड वाहनांना वंजारपट्टी पुल व बागेफिरदोस येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने वंजारपट्टी पुलावरून तसेच खंडूपाडा येथे डावीकडे वळण घेवून अवचितपाडा –चाविंद्रा नाका–वडपे नाका येथून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ वरून रांजनोली नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) ठाण्याकडून अंजुरफाटा मार्गे भिवंडी शहरात येणाऱ्या जड अवजड वाहनांना कल्याण नाका येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने कल्याण नाका येथे उजवीकडे वळण घेवून आसबीबी–नवीवस्ती–भादवड मार्गे रांजनोली नाका राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ वरून इच्छित स्थळी जातील.

३) ठाणे ,कल्याण व नाशिक कडून साईबाबा जकात नाका मार्गे वाडा बाजूच्या दिशेने जाणाऱ्या जड अवजड वाहनांना रांजनोली नाका येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने वडपा नाका येथे डावीकडे वळण घेवून चाविंद्रा –वंजारपट्टी पुलावरून इच्छित स्थळी जातील.

४) भिवंडी शहरातील नारपोली पो.स्टे. ते नदिनाका या दरम्यान रोडच्या दोन्ही बाजूस सर्व प्रकारच्या वाहनांना पुर्ण वेळ पार्किंग करण्यात मनाई (No parking) करण्यात येत आहे.

**सदरची अधिसुचना ही प्रसिध्द झाल्यापासून राजीव गांधी उड्डाणपुलाचे दुरूस्तीचे काम संपेपर्यंत सदर पुलाचे दुरूस्ती चे कामातील वाहनाखेरीज इतर जड अवजड वाहनासाठी अमलात राहिल.**

( अमित का.काळे )
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग,
ठाणे शहर

प्रति,
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे
२/–सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहीतीसाठी सादर :–**
मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

**प्रत माहितीसाठी सादर :–**
मा.जिल्हाधिकारी, ठाणे
मा.आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी.

प्रत सस्नेह अग्रेषित
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण.
पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा पथक ,ठाणे
पोलीस उप आयुक्त, वाहतूक, नवी मुंबई.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२ भिवंडी व विशेष शाखा,ठाणे शहर

प्रत कार्यवाहीस्तव :–
प्रादेशिक परीवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण व नवी मुंबई.
विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, कल्याण, भिवंडी व ठाणे.

प्रत कार्यवाहीस्तव :–
सपोआ भिवंडी वाहतूक विभाग/प्रभारी अधिकारी, भिवंडी, नारपोली व कोनंगाव वाहतूक उपविभाग.
२/– प्रभारी अधिकारी यांनी आपले वा.उपविभागाचे हद्दीत जड–अवजड वाहनांची वाहतूक वळविण्याचे ठिकाणी कर्मचारी नेमावेत.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा,ठाणे
२/– सदरची अधिसुचना नागरीकांचे माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी करणेस विनंती आहे.

प्रत :– प्रभारी अधिकारी नियंत्रण कक्ष, ठाणे /भिवंडी व वाहतुक नियंत्रण कक्ष, ठाणे

प्रतः– समन्वय अधिकारी ,९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– त्यांनी सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्द करावी.

प्रत :– वाहतूक संघटना ,ठाणे,भिवंडी,कल्याण शहर पोलीस आयुक्तालय, परिसर.
२/– वाहतूकीत केलेल्या बदलाबाबत त्यांनी त्यांचे वाहनचालकांना अवगत करावे.